# BDC LIBRARY

## New Paper Clipping

### A.Y. 2024-2025

# निर्माल्य संकलन : देसाई कॉलेजचा स्तुत्य उपक्रम



**महाराष्ट्र न्यूज नेटवर्क**

**पाटण, दि. १९ सप्टेंबर :** येथील बाळासाहेब देसाई कॉलेज पाटण व रोटरी क्लब पाटण तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने गौरी गणपती विसर्जनाच्या दिवशी निर्माल्य संकलनाचा उपक्रम दरवर्षी राबविला जातो. व या उपक्रमास चांगला प्रतिसाद मिळत आहे.

बाळासाहेब देसाई कॉलेज पाटण व रोटरी क्लब तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभाग एनसीसी व आयक्यूएसी यांच्या संयुक्त विद्यमाने गौरी गणपती विसर्जनाच्या दिवशी निर्माल्य संकलनाचा उपक्रम दरवर्षी राबविला जातो. गणपती विसर्जनाच्या वेळी महाविद्यालयाचे प्राध्यापक, रोटरी क्लबचे मेंबर व राष्ट्रीय सेवा योजनाचे कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक पाटण मधील विविध विसर्जनस्थळी उभे राहून निर्माल्य दान करण्याचे आवाहन करीत व उपक्रमास प्रत्येक वर्षी प्रतिसाद वाढत असल्याचे कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण यांनी सांगितले.

२००६ पासून आम्ही हा उपक्रम राबवीत आहोत सुरुवातीच्या काळात आम्हाला व्यवस्थितरित्या प्रतिसाद मिळत नव्हता परंतु आम्ही लोकभावनेचा आदर करून त्यांना प्रबोधन करून निर्मांल्य मुळे नदीचे होणारे प्रदूषण याची व्यवस्थितपणे माहिती सांगितल्यामुळे लोकांच्यात आता बदल होत आहे तसेच लोक पर्यावरणपूरक उत्सव साजरा करत असल्याने आमच्या या उपक्रमास चांगला प्रतिसाद मिळून जवळपास २ ट्रॅक्टर निर्माल्या एकत्रित केले असून आम्ही ते नगरपंचायतच्या माध्यमातून त्याची योग्य रीतीने विल्हेवाट लावणार असल्याचे प्राचार्य डॉ.पवार यांनी सांगितले.

या उपक्रमामध्ये पाटण नगरपंचायतचे मुख्याधिकारी डॉ. मोरे, उपगराध्यक्ष सागर पोतदार, रोटरी क्लब अध्यक्ष संजीव चव्हाण, प्राचार्य डॉ. एस.डी. पवार, एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी डॉ. भरत जाधव ,प्रा. डॉ. एच. व्ही. काटे, प्रा. डॉ. एस. एस. कुंभार, प्रा. लक्ष्मण गणगे, प्रा. विशाल कांबळे, एन. सी. सी. अधिकारी डॉ. संतोष पाटील, डॉ. मंजुषा शिंदे, प्रा. प्रदीप गायकवाड, प्रा. आंबेगावे, प्रा. बळीराम लोहार यांनी विशेष परिश्रम घेतले.

आपल्या लाडक्या भक्तांचा पाहुणचार स्वीकारण्यासाठी गणरायाचे घरोघरी आगमन झाले आहे. बाप्पाची पूजा करताना त्याला पाने, फुले हार, फळे, दुर्वा असे सारे काही मनोभावे रोज अर्पण केले जाते. या पानाफुलांचे दुसऱ्या दिवशी निर्माल्य होते. परमेश्वर चरणी वाहिले जाणारे हे निर्माल्य पुन्हा निसर्गामध्ये एकरूप व्हावे यासाठी हे निर्माल्य आपल्या घरातील कुंड्या किंवा अंगणातील झाडांना अर्पण केले तर त्याचे खत तयार होऊन एक पर्यावरण पूरक उत्सव साजरा केल्याचे समाधान लाभते. त्यामुळे निर्माल्य संकलनाला सहयोग द्यावा असे आवाहन एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी डॉ. गजानन पट्टेबहादूर यांनी केले आहे.